# गुठली तर परी आहे

कनक शशि



एकलव्य



# गुठली तर परी आहे

लेखन व चित्रे
कनक शशि

अनुवाद
रमा हर्डीकर-सखदेव

एकलव्य



गुठली तिचे आई, बाबा आणि बहीण-भावासोबत राहते. ती घरात सगळ्यात लहान आहे.







गुठली खूप बडबडी आहे. तिला पऱ्यांची चित्रं काढायला खूप आवडतात. सातपुड्यातल्या लहान-मोठ्या पर्वतांवर मनसोक्त भटकणं, वेगवेगळी फुलं आणि पानं गोळा करणं तिला फार आवडतं. कोंबडीच्या पिल्लांशी खेळायला, झोका घ्यायला आणि झाडावर चढायला तिला मजा वाटते. गुठलीला सायकल चालवता येते, आणि टायरमध्ये हवासुद्धा भरता येते. मस्त खुशालचेंडू आहे गुठली.





घरी गुठली सगळ्यांची लाडकी आहे. आई जेव्हा तिला माझी सोनपक्षी म्हणते तेव्हा तिचे गाल डाळिंबाच्या दाण्यासारखे लाल लाल होतात!

उद्या दिवाळी आहे. सगळे जण घर सजवण्यात गुंतलेत. गुठली आणि ताई रांगोळी काढतायत. सगळ्यांसाठी नवीन कपडे आणलेयत.








पण गुठलीला मात्र तिच्यासाठी आणलेले कपडे आवडले नाहीयेत. तिला आपल्या बहिणीचा फ्रॉक आवडलाय. तिने हळूच बहिणीचा फ्रॉक घातला. ते पाहून ताई चिडून ओरडली, “तू माझे कपडे का घातलेस?” गुठलीच्या बाबानेही तिच्याकडे रागाने पाहिलं. आणि दादा तिला हसायला लागला.

गुठलीच्या डोळ्यांत पाणीच आलं.







आई गुठलीला आपल्या खोलीत घेऊन गेली आणि तिला जवळ घेतलं. आई तिला म्हणाली, “बेटा, तू मुलगा आहेस. तू तुझेच कपडे घालायला हवेस, ताईचे नव्हे.”

त्यावर गुठली म्हणाली, “पण मला तर परी व्हायचंय. आणि तू मला सारखं मुलगा का म्हणतीएस? मी तर मुलगी आहे!”

“कारण तू तुझ्या दादासारखा आहेस. ताईसारखा नाहीस. हे बघ गुठली, मुलगे मुलगे असतात आणि मुली मुली असतात!” आई म्हणाली.





"अजिबात नाही, मी परी आहे!" गुठली हट्टाने म्हणाली.

"पण बेटा, तू मुलगा आहेस आणि मुलं परी नसतात. ते तर राजकुमार असतात आणि तू जगातला सगळ्यात देखणा राजकुमार आहेस," आई गुठलीला मिठीत घेत म्हणाली.

गुठलीने रागाने आईची मिठी सोडवली. "मी राजकुमार नाहीये! मी मुलगी आहे आणि मला हा फ्रॉक घालायचाय!"

आता आईलाही राग आला. "हट्ट करू नकोस, गुठली. जा, आधी हा फ्रॉक बदल," असं म्हणून ती खोलीतून बाहेर निघून गेली.





त्या दिवसांनंतर गुठली उदास उदास राहू लागली. दिवाळीतसुद्धा ती गप्पगप्पच होती. फटाके, मिठाया आणि लोकांच्या हास्यविनोदांपासून दूर एकटीच आपल्या विचारात हरवलेली होती.





उदास गुठली आता बोलेनाशी झाली होती. ती बहुतेक वेळा एकटीच असायची आणि फुलं-पानं आणि कोंबडीच्या पिल्लांशी गप्पा मारायची. तेच तिचे मित्र-मैत्रिणी होते ना. गुठलीचा चिवचिवाट घरात ऐकू येईनासा झाला होता.


गुठली
के
लिए



असंच एक दिवशी गुठली डोंगरावर फिरून परत आली, तेव्हा आईने तिला एक पाकीट दिलं.

गुठलीने ते पाकीट अगदी सावकाश उघडलं आणि एकदम आनंदाने चीत्कारलीच. तिने आश्चर्याने आईकडे पाहिलं. पाकिटात परीच्या फ्रॉकपेक्षाही सुंदर फ्रॉक होता.

आईने गुठलीला जवळ घेऊन सांगितलं, “हा घाल आणि तुला जसं हवं ना तसंच रहा. पण माझ्यासाठी तर तू माझी सोनपक्षीच आहेस.”

गुठलीने फ्रॉक छातीशी घट्ट धरला आणि ती आईच्या गळ्यात पडली.





फ्रॉक घालून ती खूप नाचली. गुठली सोनपक्षी होती, जी आकाशात खूप उंच उडू शकत होती. जगाच्या नियमांपेक्षाही उंच! तेच नियम, जे म्हणायचे की गुठली मुलगी नाही, मुलगा आहे. जेव्हा की गुठली तर स्वतःला मुलगीच समजायची.

कदाचित पुढे जाऊन गुठली हे नियम बदलेल किंवा एखादं नवंच जग निर्माण करेल. पण आत्ता गुठली परी आहे, आणि आजच्यापुरतं तितकं पुरेसं आहे.





गुठली तर परी आहे
GUTHLI TAR PARI AHE

लेखन व चित्रे: कनक शशि
डिझाइन: कनक शशि
अनुवाद: रमा हर्डीकर-सखदेव
संपादन: ईशा बडकस

लेखन व चित्रे: कनक शशि, ऑगस्ट 2021
वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या कथेचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखकाचा आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कोणत्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखक-चित्रकाराशी अवश्य संपर्क करा.

हे पुस्तक *गुठली तो परी है* या नावाने एकलव्य द्वारे हिंदी मध्ये प्रकाशित.
*Guthli Has Wings* या नावाने तुलिका द्वारे इंग्रजीत प्रकाशित
आणि *Guthli Can Fly* या नावाने वाचकांसाठी इंग्रजीत संच, मुस्कान, भोपाळ द्वारे.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्टच्या अर्थसाहाय्यातून प्रकाशित

प्रकाशन: ऑगस्ट 2021/2000 प्रती
कागद: 100 gsm मॅट आर्ट पेपर आणि 210 gsm एफबीबी पेपरबोर्ड (मुखपृष्ठ)
ISBN: 978-93-91132-64-4
मूल्य: ₹ 55.00

प्रकाशक: **एकलव्य फाउंडेशन**
जमनालाल बजाज परिसर,
जाटखेडी, भोपाळ – 462 016 (मप्र)
फोन +91 755 255 0976, 267 1017
वेबसाइट: www.eklavya.in; ईमेल: books@eklavya.in

मुद्रक: आर के सिक्युप्रिंट, भोपाळ, फोन: +91 755 268 7589

## कनक शशि

कनक यांना निसर्गात रमायला आवडतं. बाहेर फिरताना त्या वाळलेल्या काटक्या, पानं, बिया, पक्ष्यांची पिसं गोळा करतात – त्यात कितीतरी गोष्टी लपलेल्या असू शकतात ना!

कनक चित्रकार आहेत. त्यांनी एम एस युनिव्हर्सिटी, बडोदा इथून चित्रकलेचं शिक्षण घेतलं आहे. गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ त्या पुस्तकांसाठी चित्रं आणि डिझायनिंग करत आहेत. त्याचबरोबर त्या कथाही लिहितात.

गुठली सगळ्यांची लाडकी आहे. तिचे मित्र-मैत्रिणी असलेल्या कोंबडीच्या पिल्लांसोबत ती नेहमी खूश असते.

एक दिवस ती आपल्या आवडीचा फ्रॉक घालते. तिला तो फ्रॉक काढून टाकायची आणि पुन्हा कधीही फ्रॉक न घालायची ताकीद दिली जाते. त्या दिवसा पासून गुठलीच्या रंगीबेरंगी दुनियेत जणू गोंधळ सुरु होतो.

गुठलीला तिचा आवडता फ्रॉक का घालू दिला नसेल? पण, ही गुठली आहे तरी कोण?



parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS
एकलव्य
मूल्य: ₹ 55.00
9 789391 132644